# सूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे**
**कलम २६ (१) अन्वये**
**भिवंडी निजामपुर शहराच्या प्रारूप सुधारित विकास योजनेचे प्रसिध्दीकरण**

**क्रमांक:-जा. क्र. वियोविघ/भिवंडी नि.श.मनपा/कलम २६/प्रसिध्दी/**१९४, **दि.** ५ / १० /२०२३

ज्याअर्थी, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने (यापुढे "उक्त नियोजन प्राधिकरण" असे निर्देशिलेली) तिच्या अधिपत्याखालील क्षेत्राची (यापुढे "उक्त क्षेत्र" असे उल्लेखलेली), महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेली) चे कलम २३(१) व कलम ३८ मधील तरतुदींनुसार प्रारूप सुधारित विकास योजना (यापुढे "उक्त प्रारूप विकास योजना" असे उल्लेखलेली) तयार करण्याचा इरादा ठराव क्र. ४५६, दि.०८.०२.२०२२ अन्वये जाहीर करून त्याबाबतची सुचना महाराष्ट्र राजपत्र, कोकण विभाग भाग दोन (संकिर्ण)-१, मार्च १०-१६, २०२२ रोजी प्रसिध्द केली आहे;

आणि त्याअर्थी, उक्त अधिनियमच्या कलम २४ च्या तरतुदीस अनुसरुन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेनी उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारुप विकास योजना तयार करण्यासाठी महानगरपालिकेकडे शासनाकडील प्रतिनियुक्तीवर असलेले सहाय्यक संचालक, नगर रचनाकार यांची "नगररचना अधिकारी" म्हणून आदेश क्र. भिनिशमनपा/आयुक्त कार्या./१३२/२०२२ दि.२३/०५/२०२२ अन्वये नेमणूक केली;

आणि, ज्याअर्थी, उक्त अधिनियमातील तरतुदीनुसार, नगर रचना अधिकारी तथा सहायक संचालक, नगर रचना, विकास योजना, विशेष घटक भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी यांनी, उक्त अधिनियमाचे कलम २५ अन्वये विद्यमान जमीन वापर नकाशा तयार केल्यानंतर, उक्त क्षेत्राची उक्त प्रारुप विकास योजना तयार करुन ती उक्त नियोजन प्राधिकरणाकडे उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये प्रसिध्द करण्यासाठी दि. १३/४/२०२३ रोजी हस्तांतरीत केली आहे;

आणि, ज्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरणाने म्हणजे मा.प्रशासक यांनी उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्वये उक्त प्रारुप विकास योजना जनतेकडुन सुचना / हरकती मागविण्याकरीता प्रसिध्द करण्यासाठी ठराव क्र. २६५, दि.५/ १० /२०२३ पारित केलेला आहे;

त्याअर्थी, उक्त नियोजन प्राधिकरण उक्त प्रारूप विकास योजना, विकास योजना अहवालासह उक्त अधिनियमाचे कलम २६(१) अन्यये, नागरिकांकडून सूचना/ हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. सदरहू योजनेसंबंधीचे नकाशे व अहवाल कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत नागरिकांच्या अवलोकनार्थ, खाली नमूद केलेल्या कार्यालयात उपलब्ध आहेत;

(१) मा.सहसंचालक, नगररचना, कोकण विभाग, कोकणभवन, नवी मुंबई कक्ष क्र.३०५, तिसरा मजला, कोकण भवन, नवी मुंबई- ४००६१४

(२) सहायक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, ठाणे. जिल्हाधिकारी कार्यालय इमारत, ३ रा मजला, कोर्ट नाका, ठाणे (प.) ४००६०१.

(3) नगर रचना अधिकारी तथा सहाय्यक संचालक नगररचना, विकास योजना विशेष घटक, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
(४) सहाय्यक संचालक नगररचना, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.

उक्त प्रारूप विकास योजनेचे नकाशे व तपशिलाच्या प्रती योग्य शुल्क आकारून नागरिकांना भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेत उपलब्ध होऊ शकतील.

उक्त प्रारूप विकास योजनेतील तरतुदीसंबंधी नागरिकांच्या काही सूचना/ हरकती असतील तर त्यांनी ही सूचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झालेल्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत प्रशासक तथा आयुक्त, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका, नविन प्रशासकीय ईमारत, जुना एस.टी.स्टँड, काप आळी, भिवंडी, जि. ठाणे -४२१३०२ यांचे कार्यालयाकडे लेखी स्वरुपात कारणांसह पाठवाव्यात. सदरची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका यांचेकडे प्राप्त झालेल्या सूचना / हरकतींवरच केवळ विचार करण्यात येईल.

ठिकाण:- भिवंडी.
दि. ५ / १० /२०२३

(अजय विलास वैद्य)
प्रशासक तथा आयुक्त,
भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी

**Notice**

**Publication of Draft Development Plan of Bhiwandi Nizampur under Section 26(1) of Maharashtra Regional & Town Planning Act. 1966**

No.-DPSU/BNCMC/Section 26/Publication/ 194 Date- 5 / 10 /2023

Whereas, the Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, (hereinafter referred to as "the said Planning Authority") vide resolution No. 456, dated 08.02.2022, had declared its intention to prepare a Draft Revised Development plan of Bhiwandi Nizampur City (hereinafter referred to as the "said Draft Development plan") for the area under its jurisdiction, (hereinafter referred to as "the said area") as per the provision of section 23(1) and 38 of Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (hereinafter referred to as "the said Act") and notice to that effect is published in Maharashtra Government Gazette Konkan Division Supplement Part 2 on March 10-16, 2022;

And whereas, as per the provision in section 24 of the said Act. The Bhiwandi Nizampur City Municipal Corporation vide order No.-BNCMC/Comm.Ofc./132/2022, Dt.23/05/2022 had appointed Assistant Director of Town Planner as "Town Planning officer" who is on Deputation from Government in Bhiwandi Nizampur City Municipal Corporation to prepare the said draft Development Plan for the said area;

And whereas, the Town Planning officer and Assistant Director of Town Planner Development Plan Special Unit, Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, Bhiwandi after having prepared Existing Land Use Map as per section 25 of the said Act, has prepared the said Draft Development Plan of the said area and has handed it over to the said planning authority on Dt.13/072023 for publication under section 26(1) of the said Act;

And whereas, the said Planning Authority i.e. Administrator has passed Resolution No. 264 dated- 5/10/23 to publish the said Draft Development Plan under section 26(1) of the said Act, for inviting suggestions/ objections from the public;

Therefore, Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, Bhiwandi hereby publishes the said Draft Development Plan along with the Report under section 26(1) of the said Act for inviting suggestions/objections from public. The copy of the said Draft Development Plan & Report thereof are kept open for inspection of the public at the following offices on all working days during office hours;

1. Hon'ble Joint Director, Town Planning, Konkan Division, Navi Mumbai, 305, 3rd Floor, Konkan Bhavan,
   Navi Mumbai-400614.
2. Assistant Director, Town Planning, Thane Branch, Thane. 3rd Floor. Collector Office, Court Naka, Thane West 400601
3. Assistant Director, Town Planning, Development Plan Special Unit, Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, Bhiwandi.
4. Assistant Director, Town Planning, Bhiwandi Nizampur City Municipal Corporation, Bhiwandi.

The copies of the said Draft Development Plan and Particulars shall be available to the public at the reasonable price in the office of the Bhiwandi Nizampur City Municipal Corporation.

The suggestions/objections if any, in writing from public in this regard with reasons, shall be submitted to the Administrator and Municipal Commissioner, Bhiwandi Nizampur Municipal Corporation, New Administrative Building, old S.T. Stand, kap Ali, Bhiwandi, Dist.: Thane - 421302 within the period of 30 days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette. Suggestions/ Objections received by the Bhiwandi Nizampur Municipal Corporation within the period of 30 days from the date of publication of this notice in Maharashtra Government Gazette shall only be considered.

Place – Bhiwandi.
Date- 5/10/2023

**(Ajay Vilas Vaidya)**
**Administrator and Municipal Commissioner,**
**Bhiwandi Nizampur City Municipal**
**Corporation, Bhiwandi**